RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग दोन

वर्ष १२, अंक ३४] मंगळवार, मे ५, २०२६/वैशाख १५, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक ६३

प्राधिकृत प्रकाशन

चिपळूण नगरपरिषद, चिपळूण

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल करणेबाबत)

जाहीर सूचना

नगररचना विभाग २०२६-२७, जा.क्र.०४०८

ज्याअर्थी, चिपळूण शहराची प्रथम सुधारित विकास योजना दि.०१/०३/१९८९ रोजी अंमलात आली आहे. तसेच नगररचना योजना चिपळूण क्र.१, शासनाचे पत्र क्र.नरयो चिपळूण क्र.१/कलम ८६/ टिपीव्ही - ३/३११५, दि.१६/०५/२०१२ अन्वये मंजूर झालेली आहे. तसेच चिपळूण शहराची दुसरी सुधारित विकास योजना अधिसूचना क्र. टिपीएस/१७१७/५५१/प्र.क्र.१५५/१८/नवि-१२ दि.३/११/२०१८ अन्वये भागशः मंजूर असून, या योजनेस चिपळूण शहराची भागशः विकास योजना असे संबोधण्यात येत आहे. त्यानुसार टिपीएस -१७१७/५५१/प्र.क्र.१५५ (भाग-१)/१८/नवि-१२, दि.२५/१०/२०२३ अन्वये ईपी १ ते ८५ पैकी ८४ वगळून फेरबदलासह मंजुरी देण्यात आली आहे.

त्यानुसार चिपळूण नगररचना योजना क्र.१ मधील अंतिम भूखंड क्रमांक ५४ व ७२ ह्या मिळकतीमधून १८ मीटर रूंदीचा रस्ता प्रस्तावित आहे. तरी अंतिम भूखंड क्रमांक ५४ व ७२ चे संपूर्ण क्षेत्र १८ मीटर रूंदीचा रस्त्यामधून वगळून रहिवास विभागामध्ये समाविष्ट करणेकामी चिपळूण नगरपरिषदेचा मे. मुख्यसभा ठराव क्र.१६, दि.२२/०४/२०२६ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदल करण्याचे नियोजिलेले आहे.

सर्व नागरिकांना या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, ज्यांना या फेरबदलाबाबत आक्षेप व सूचना द्यावयाच्या असतील त्यांनी सदरची जाहीर सूचना **महाराष्ट्र राजपत्रामध्ये** प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे मुदतीत लेखी स्वरूपात चिपळूण नगरपरिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाठविणेत याव्यात म्हणजे त्याचा विचार प्रस्तुत प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजुरीकरिता सादर करणेपूर्वी करणेत येईल.

नियोजित किरकोळ बदल दर्शविणारा नकाशा नगरपरिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध करून ठेवलेला आहे.

संजय जाधव,
मुख्याधिकारी,
चिपळूण नगरपरिषद.

चिपळूण,
दिनांक ५ मे २०२६.

CHIPLUN MUNICIPAL COUNCIL, CHIPLUN

(Regarding modification Under Section 37(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966)

Public Notice

नगररचना विभाग २०२६-२७, जा.क्र.०४०८

Whereas the first revision of Development plan of Chiplun City came into effect on 01/03/1989. Town Planning Scheme No.1 of Chiplun City, Government Letter No. 1/Section 86/TPV - 3/3115, Dated 16/05/2012 has been approved. Also, the Second revision Development Plan of Chiplun City *vide* notification No. partially approved *vide* TPS-1717/551/Pro.No.155/18/Navi-12, dated 03/11/2018, this plan is called as Partial Development Plan of Chiplun City. Accordingly approval has been given *vide* TPS-1717/551/Pro.No.155/Pro.No(Part-1)/18/Navi-12, dated 25/10/2023 *vide* EP 1 to 85 excluding 84 with modification.

According to Town Planning Scheme No.1 of Chiplun City are Final Plot No. 54 & 72 affected by 18 meter wide DP road. However, it is planned to cancle the 18 meter DP road affecting the final plots 54 & 72, and area so released is included in residential zone as per the resolution of the Chiplun Municipal Council, May 16, dated 22/04/2026, as per Section 37(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

All the citizens are informed by this public notice that those who wish to give objections and suggestions regarding this amendment should send the said public notice in writing to the office of Chiplun Nagar Parishad within one month from the date of its publication in the *Maharashtra Gazette* during office hours so that the same may be considered before submitting the proposal to the Government for final approval.

A map showing the planned minor changes is available for public inspection at the Chiplun Nagar Parishad office during office hours.

SANJAY JADHAV,
Chief Officer,
Chiplun Municipal Council.

Chiplun,
Dated 5th May 2026.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.